


महाराष्ट्र शासन
## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य
२८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१
दू. क्र. ०२०/२६३३३७४३ Website-www.trti.maharashtra.gov.in Email ID-coordtrti@gmail.com

**महत्वाचे**

क्र. आसंप्रसं-२०२५/प्र.क्र.१८/का-३(समन्वय)/ ४२८ दि. ३०/०९/२०२५.

प्रति,

सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती
पुणे/ठाणे/पालघर/नाशिक/नाशिक-२/नंदुरबार/धुळे
छत्रपती संभाजीनगर/किनवट/अमरावती/यवतमाळ
नागपूर/गोंदिया/गडचिरोली/चंद्रपूर.

विषय : पोलीस व सैन्य भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण-२०२५ करीता अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचे अर्ज स्वीकारणे व निकाली काढणेबाबत.....

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, गतवर्षी प्रमाणे सन २०२५ या वर्षामध्ये या कार्यालयांकडून अनुसूचित जमातींच्या उमेदवारांकरीता पोलीस व सैन्य भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण-२०२५ राबविण्यात येत आहेत. त्याकरीता उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर प्रशिक्षणाकरीता अर्ज करणा-या उमेदवारांकडे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे. परंतू सदर अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी केलेले वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नाही. तसेच सदर उमेदवार हे सद्य:स्थितीत अन्य कोणत्याही शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशित नसल्याने त्यांना या योजनेचा लाभ घेण्याकरीता शिफारस पत्रांअभावी (Authority Letter) अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्याकरीता अडचण येत आहे. त्याचप्रमाणे अन्य काही उमेदवार यांनी यापूर्वीच तपासणी समितीकडे त्यांच्याकडील अनुसूचित जमाती प्रमाणपत्राची तपासणी करण्याकरीता प्रस्ताव सादर केलेले आहेत. परंतू त्यांनाही अद्याप पडताळणी करुन वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले नाही. सदर प्रशिक्षणाकरीता वैधता प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आले असल्याने ज्या उमेदवारांकडे वैधता प्रमाणपत्र नाही असे उमेदवार या प्रशिक्षण योजनेपासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यामुळे सन २०२५ या वर्षाकरीता उक्त नमूद प्रशिक्षण योजनेचा लाभ घेण्याकरीता अर्ज सादर केलेल्या ज्या उमेदवारांकडे वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नाही असे उमेदवार पोलीस व सैन्य भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी केलेल्या अर्जासह पडताळणीकरीता आवश्यक कागदपत्र घेऊन समिती कार्यालयास आल्यास **अशा उमेदवारांचे बाबतीत सदर पत्र हे शिफारस पत्र (Authority Letter) गृहीत**

**धरुन** त्यांच्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणीचे प्रस्ताव आवश्यक माहिती व कागदपत्रांसह स्वीकारण्यात यावे. त्याचप्रमाणे सदर उमेदवारांचे तसेच यापूर्वी समिती कार्यालयास सादर केलेल्या परंतू सद्य:स्थितीत ज्या उमेदवारांचे प्रस्ताव पूर्वीपासून समिती कार्यालयाकडे प्रलंबित आहेत अशा उमेदवारांचे पडताळणी प्रकरणी अधिनियम, २००० व नियम, २००३ मधील तरतूदीनुसार प्राधान्याने निकाली काढण्यात यावीत.

(दिपा मुधोळ-मुंडे, भा.प्र.से.) 30/9/25

आयुक्त

प्रत :- स्पर्धा परीक्षा कक्ष, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.